# प्रेसनोट

जा.क्र. ६३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०१/१०/२०१६

पोलीस स्टेशन जवाहरनगर अंतर्गत दिनांक ३०/०९/०१६ रोजी आर्डनन्स फॅक्टरी जवाहरनगर मेन गेट चे ५०० मीटर समोर रंगीत तालीम घेण्यात आली. रंगीत तालीम घेण्याचे अगोदरपासुन मा. पोलीस निरीक्षक, आर. आर. नागरे पो. स्टे. जवाहरनगर हे सर्चीग ऑपरेशनचे संदर्भात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन व दसरा बंदोबस्त या विषयावर चर्चा करण्याकरीता आर्डनन्स फॅक्टरी जवाहरनगर येथे मा. कर्नल एस. के. कपुर यांचे सोबत हजर होते. रंगीत तालीम करीता मा. उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा हजर राहीले. ऑर्डन्स फॅक्टरी चे मेन गेट कडे जाणा–या रोडवर एका पुलीया खाली लालसर रंगाची एक बॅग पो. नि. गाडे तसेच पोउपनि. मानकर यांचेतर्फे कोणालाही काहीही माहिती न करता ठेवण्यात आली. कर्नल एस. के. कपुर ऑर्डन्स फॅक्टरी जवाहरनगर यांनी कंट्रोल रुम भंडारा येथे फोन करुन कळविले की, पुलीयाखाली एक लालसर रंगाची बॅग ठेवण्यात आलेली आहे. अशा माहिती वरुन सिआरओ येथुन लागलीच १२.७ वा. बिडीडीएस व डॉग स्कॉट घटनास्थळी रवाना करण्यात आले. तसेच या दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा यांना फोनव्दारे सुचना दिली. त्याचप्रमाणे बिनतारी संदेशावरुन सुध्दा सुचित करण्यात आले. ते शुध्दा घटनास्थळी १२.५५ वा. पोहचले. त्याचे मार्गदर्शनात बिडीडीएस व डॉग स्कॉट ने घटनास्थळावरील संशयीत बॅगचे आजुबाजुला रेतीने भरलेल्या बॅग लावुन वस्तुला सुरक्षित करुन ठेवल्यानंतर त्यांचे कडील साहीत्यासह बॅगचे निरीक्षण केले. सदर बॅगमध्ये घातपाताचे साहित्य किंवा धोकादायक तसेच हानीकारक वस्तु मिळुन आल्या नाहीत. रंगीत तालीम दरम्यान १०० ते १५० फुटापर्यत पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तेथे लोकांचे अवागमन बंद करण्यात आली होती. वाहतुक सुरक्षित दिशेला वळविण्यात आले होते. घटनास्थळाचे व्हिडिओ चित्रीकरण तयार करण्यात आले. रंगीत तालीम दिनांक ३०/०९/२०१६ चे १२.०४ वा. ते १४.०० वा. पर्यत उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा यांचे मार्गदर्शनात संपविण्यात आले.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्राति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.